# महात्मा बसवेश्वर यांचे जाती आणि धार्मिक कर्मकांड विषयीचे विचार

**संशोधनकर्ती**
**प्रा. गायत्री आर. सिरसाम,**
गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय,
तुमसर

**गोषवारा :-** महात्मा बसवेश्वर हे कर्नाटक राज्यातील संत व समाज सुधारक होते. त्यांनी हिंदू धर्मातील जातीव्यवस्था, अस्पृश्यता आणि इतर समाज विघातक प्रथांविरुद्ध संघर्ष केला. त्यांनी निर्गुण निराकार एकेश्वरवादी श्रद्धेचा पुरस्कार केला.

भारतातील प्रमुख आध्यात्मिक गुरु मध्ये त्यांची गणना होत असली तरी ते एक बंडखोर संत, कवी आणि कळकळीचे समाज सुधारक होते. महात्मा बसवेश्वर जरी आठशे वर्षांपूर्वीच्या काळातील असले तरी त्यांची शिकवण पूर्णपणे आधुनिक आणि व्यवहार्य असल्यामुळे आजही काळाशी सुसंगत वाटते. त्यांची शिकवण अनुसरली गेली असती तर भारतीय समाजाचे चित्र काही वेगळे असते. आध्यात्मिक साधने या काळात बसवेश्वराने लिहिलेली वचने म्हणजे त्यांच्या साक्षात कार्य अनुभवाच्या जिवंत दस्तावेज आहे.

प्रस्तुत अध्ययनात महात्मा बसवेश्वरांचा वचनांच्या आधारे त्यांनी त्या काळात प्रस्थापित व्यवस्थेतील जातीव्यवस्था, धार्मिक कर्मकांडावर कशाप्रकारे प्रहार केला आहे. तसेच व्यवस्थेमध्ये कसे बदल घडवून आणले, आपल्या वचनाच्या माध्यमाने समाजाला कसे अज्ञानाकडून – ज्ञानाकडे, अंधश्रद्धेकडून विवेकवादाकडे, विषमतेकडून - समानतेकडे, देवालयाकडून - देहालयाकडे, देहकदंडनाकडून - देह धर्माकडे, ग्रंथ प्रमाण्यवादाकडून-बुद्धीप्रामाण्यवादाकडे घेऊन जाणारी नवी व्यवस्था निर्माण करणारे महात्मा बसवेश्वर सामाजिक क्रांतीचे अग्रदूत होते. प्रस्तुत अध्ययनात महात्मा बसवेश्वरांचे वचने आजच्या आधुनिक भारतात जिथे जातीव्यवस्था संकेतात्मक स्वरूपात अस्तित्वात आहे तसेच धार्मिक कर्मकांड अजूनही अस्तित्वात आहे अशा समाजाशी महात्मा बसवेश्वर यांचे वचनाच्या सहसंबंध विशेद करण्यात आले आहे. तसेच त्यांच्या जाती कर्मकांड आणि अंधश्रद्धा विरुद्ध च्या कार्याचा आढावा घेताना काही सामाजिक विचारवंतांच्या विचाराशी सहसंबंध जोडण्याच्या प्रयत्न या अध्ययनात करण्यात आलेले आहे.

**बीजशब्द** :- जात , धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्धा, समाज व्यवस्था ,वचने.

**प्रस्तावना** :-

आपल्या भारत भूमीने व्यास, कपिल, कनाद, गौतम चार्वाक ,महावीर आणि बुद्ध यांच्यासारखे श्रेष्ठ तत्त्ववेते मिळते चंद्रगुप्ता सारखे सम्राट निर्माण केले. समाजभरवटीला आला आणि नंतरच्या काळात अधोगती ही झाली. निरर्थक, अर्थहीन, अंधश्रद्धा, परंपरांनी उच्छाद मांडला. स्पृश्य-अस्पृश्यता यासारख्या समाजाला मागे खेचणाऱ्या प्रथा बोकडल्या. दुर्दैव असे की हे सारे धर्माची झूल पांघरून सुरू होते. अशावेळी महात्मा बसवेश्वर यांच्या उदय झाला. आधुनिक सुधारणा वादा पेक्षा महात्मा बसवेश्वर वेगळे होते. 19 व्या शतकातील थोर सुधारक स्वामी विवेकानंदाच्या शब्दात सांगायचे तर आधुनिक सुधारणावादांना धर्माची मोडतोड केल्यावाचून सामाजिक सुधारणा करणे अशक्य वाटते.

शालिवाहन शके दहाव्या शतकात कर्नाटकातील विजापूर जिल्ह्यातील इंगळेश्वर -बागेवाडी या गावात ११०५ साली प्रतिष्ठित वीरशैव कुटुंबात बसवेश्वरांचा जन्म वैशाखातील अक्षय तृतीयेला झाल्याचे मानले जाते. अगदी लहान असतानाच बसवेश्वरामध्ये स्वतंत्र बाण्याची व श्रेष्ठत्वाची चिन्हे दिसत होती. तो विलक्षण आणि स्वतंत्र मनवृत्तीच्या होता. सनात आणि ब्राह्मण कुटुंबात जन्मल्यामुळे आपल्या घरात आणि भोवतालच्या परिसरात कटाक्षाने पाळले जाणारे कर्मट विधी आणि कडक रितीरिवाज याबद्दल मनात खडबड माजविणारे अनेक प्रसंग त्यांच्या आयुष्यात आले. धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धेच्या आणि पोथी निष्ठेचाच पगडा
लोकांच्या मनावर असल्याचे तसेच मंदिरे देखील शोषणाची केंद्र बनल्याने त्यांच्या ध्यानात आले यामुळे लहानगा बसव ह्या गोष्टींवर विचार करीत असे.

वयाच्या आठव्या वर्षी त्याला आयुष्यातील पहिला संघर्षाला तोंड द्यावे लागले आणि वडिलांना चालविले ला मुंजीच्या तयारीला त्याने कडाडून विरोध केला. आपल्या जन्माच्या वेळीच लिंगधारणा द्वारे आपले उपनयन झाले आहे असे त्याचे म्हणणे होते निवड जातीच्या श्रेष्ठत्वाचे प्रतीक बनलेल्या मुंजी सारख्या विधीसाठी त्याने कोणत्याही प्रकारची तळजोड केली नाही त्यांच्या मते लिंगधारणा कोणत्याही जातीची निदर्शक नसते ते एक भक्तीचे साधन आहे कोणत्याही जाते धर्माची व्यक्ती मग ती स्त्री असो अथवा पुरुष लिंगधारणा करू शकते. महात्मा बसवेश्वराने वेद, उपनिषेध, आगम पुराने ,काव्य तसेच अनेक धर्ममताच्या आणि तत्त्वज्ञानाच्या त्याने

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV
https://doi.org/10.69758/GIMRJ/2601S01V14P107

कसून अभ्यास केला आणि आपल्याला पटलेले विचार आणि आदर्श कृतीत उतरविण्याचा त्याच्या बंडखोर मनाने ध्यास घेतला.

**पूर्व अध्ययनाच्या आढावा**:-

"The relevance of lord buseswara's philosophy in modern era" या रिसर्च पेपर मध्ये Dr. Madhuri Praful Hebbalkar जे The international journal research publication मध्ये प्रकाशित झाले आहे त्यात त्यांचे संशोधन हे प्रामुख्याने महात्मा बसवेश्वरांचे जीवन त्यांच्या सामाजिक सुधारणा आणि आजच्या परिस्थितीतील सामाजिक सुधारणाची प्रासंगिता यावर केंद्रित आहे.

"Human value in vachnas" या रिसर्च पेपर मध्ये mis. Vidya Patil यांनी या संशोधन नात महात्मा बसवेश्वराच्या वचनाच्या माध्यमाने त्यांनी सांगितलेली मानवी मूल्य, महिला मुक्ती, कायका -कार्य सिद्धांत ,अनुभव मंडप आणि अनुभवाची अकादमी यावर त्यांचे संशोधन केंद्रित आहे.

"Basaveshwara's political philosophy"या रिसर्च पेपर मध्ये prof. B.G.Patil यांचे संशोधन हे लोकशाही, समानता ,स्वातंत्र्य गुलामगिरी ,धर्मनिरपेक्षता, भ्रष्टाचार पक्षांतर, अलाइनमेंट ,कर्तव्य साम्यवाद ,इत्यादी घटकांवर बसवेश्वराच्या कार्याच्या माध्यमाने राजकीय दृष्टिकोनाने या सर्व घटकांवर संशोधन केंद्रित आहे.

"Basaveshwar's philosophy on humanity and social equality"या रिसर्च पेपर मध्ये Dr Jagannath k यांनी जे संशोधन पुनरालोकन आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय जनरल मध्ये पब्लिश आहे. त्यात त्यांनी मानवता आणि समानतेवर आधारित समाज साध्य करण्यासाठी बसवेश्वरांच्या तात्विक योगदानावर प्रकाश टाकला आहे.

वरील सर्व रिसर्च पेपर मध्ये बसवेश्वराच्या सामाजिक मानवी मूल्य आणि राजकीय विचारांवर केंद्रित आहेत. माझ्या प्रस्तुत रिसर्च पेपर मध्ये महात्मा बसवेश्वरांच्या जाती व धार्मिक कर्मकांड आणि अंधश्रद्धा विषयक वचनांच्या समावेश करून त्यांच्या वचनांच्या आधारे समाजशास्त्रीय अध्ययन करण्यात आलेले आहे.

**संशोधनाचे उद्दिष्टे :-**

या पेपरचा मुख्य उद्देश महात्मा बसवेश्वरांच्या वचनाच्या आधारे त्यांचे जाती आणि धार्मिक कर्मकांड व अंधश्रद्धे विषयीचे कार्याचे अध्ययन करणे हे आहे.

१) महात्मा बसवेश्वरांच्या वचनांच्या माध्यमाने जाती व्यवस्थेतील भेदभाव विरोधी विचार जाणून घेणे.

२) बसवेश्वरांच्या धार्मिक कर्मकांड विषयीचे विचार जाणून घेणे.

३) बसवेश्वरांच्या अंधश्रद्धे विरोधी विचार जाणून घेणे.

४) महात्मा बसवेश्वरांच्या जाती आणि धार्मिक कर्मकांड व अंधश्रद्धे विषयीचे वचने आधुनिक भारतात लागू होते काय हे जाणून घेणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन निबंध हा दुय्यम सामग्रीवर अवलंबून असून विविध पुस्तके, जनरल्स ,संशोधन लेख ऑनलाईन माहितीच्या आधारे घेण्यात आलेले आहे. सदर संशोधना करिता वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचे वापर केला गेले आहे.

महात्मा बसवेश्वर यांचे जातीविषयक विचार:-

भारतीय समाजाचे समाजशास्त्रीय दृष्टीने अध्ययन करणाऱ्या सर्व समाजशास्त्रज्ञांनी जातीव्यवस्थेचे स्वरूप आपल्या परीने अभ्यास करण्याच्या प्रयत्न केला आहे.

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य आणि शूद्र अशी चातुर वर्णव्यवस्था तिच्या निर्मिती हेतूच्या दृष्टीने अगदी प्रारंभी च्या काळात कदाचित उपयुक्त ठरले असेलही ; पण पुढे काळाच्या ओघात मात्र तिने समाजाचे विघटनच केले मूलत: ते समाज बांधणीचे मजबूत तत्व म्हणून निर्माण झाले असावे. मात्र पुढे त्याचे पर्यवसान विघातक जातीव्यवस्थेत झाले जन्मावर आधारित विभागणीचे प्रमुख तत्व असलेल्या या घृणास्पद व्यवस्थेने सामाजिक ऐक्य धोक्यात आणले जातीव्यवस्था कशी अस्तित्वात आली अथवा जातीव्यवस्था च्या उदय कसा झाला या प्रश्नाच्या संदर्भात विश्लेषणात्मक विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जातीच्या उत्पत्तीच्या सिद्धांतात केले आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते**- "जाती अंतर्गत विवाह करण्याच्या रुढीने गटाबाहेर विवाह करण्याच्या पद्धतीवर मिळविलेला विजय म्हणजे जातीची निर्मिती होय".

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते-"जाती अंतर्गत विवाह हेच जातीच्या निर्मितीचे कारण आहे. कारण जाती अंतर्गत विवाह हे जातीचे एकमेव वैशिष्ट्य आहे."

जाती व्यवस्थेचे निर्मूलन करायच्या असेल तर आंतरजातीय विवाह हाच जाती निर्मूलनाचा चांगला उपाय आहे असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना वाटते.

तर अगदी बाराव्या शतकात तात्कालीन समाज व्यवस्थेला व राज्यसत्तेला हादरून टाकणारा आंतरजातीय विवाह महात्मा बसवेश्वरांच्या पुढाकाराने घडला मागास जातीतील संत हरलया यांच्या मुलगा शीलवंत व मधुररस ब्राह्मण मंत्र्याची मुलगी कलावती यांच्यात विवाह घडून आणला. असा आंतरजातीय विवाह तोही बाराव्या शतकात हे खूपच क्रांतिकारक आणि धाडसी होते कारण आजच्या परिस्थितीतही असा विवाह स्वीकारण्याची पूर्ण मानसिकता झालेली नाही महात्मा बसवेश्वरांना रोटी बेटी व्यवहार किंवा दैनंदिन जीवनातील अन्य बाबतीत जातीच्या आधारे केला जाणारा तरतमभाव यांना त्यांना मान्य नव्हते. याविषयी ते वचन लिहितात की,

ज्यांच्या मते व्रतभंग होत नसतो.
मात्र जात लक्षात घेतात ते
विवाह जमवितांना
हे भक्त तरी कसले?
आणि सिद्ध तरी कसले?
बरे का कुंडलसंगम देवा
हे सारे रजस्वलेने
शुद्ध पाण्यात न्हावे तसे आहे.

हे खरोखरच क्रांतिकारी होते विशेषतः अठराव्या शतकापूर्वीच्या जातीव्यवस्थेत ऋतून बसलेल्या समाजात अशा बंडखोर विचारांच्या कोणता परिणाम झाला असेल याची कल्पना करणे शक्य आहे.

महात्मा बसवेश्वरांनी संपूर्ण समाज व्यवस्थेच्या  धिक्कार केला आणि चतुर्वर्णाच्या किंवा श्रम विभागणीच्या तत्त्वाच्या बुरख्याआड चाललेला पिढवणुकीच्या आणि स्वार्थी संधी साधूपणाच्या विरोधात त्याने आघाडी उघडली. धर्माचे सत्य स्वरूप त्याने तर्कशुद्ध पणे विशद केले त्यांच्या बुद्धीप्रामाण्यवादी भूमिकेचे उदाहरण म्हणून पुढील वचन सांगता येईल.

हत्या करतो तो नीच
सडके मास खातो तो शूद्र
यात यात ना पात!
कुंडलसंगमाला शरण जातो
चराचरावर प्रेम करतो
तू खरा कुलवंत असतो.

माणसाची प्रतिष्ठा त्याच्या जन्मावरून न ठरवावी असे बसवेश्वराने आग्रहाने सांगितले.
त्यांनी ऋषीमुनीची दृष्ट्या पुरुषाची उदाहरणे दिली आणि जन्माने प्राप्त होणाऱ्या जातीवर व्यक्तीचे श्रेष्ठत्व अवलंबून असते हे दाखवून दिले. पुढील वचनात ते म्हणतात की,

व्यास कोड्याच्या पुत्र
मार्कंडाच्या जन्म भ्रष्ट जातीत
मंदोदरी मंडूक दुहिता
तेव्हा पाहू नको जात पात
आपला भूतकाळ काय सांगतो?
अगस्तय पारधी होता
काश्यप सोनार होता
कौडिन्य ऋषी खरा, पण
जगाच्या दृष्टीने तो न्हावी होता
अंतः कुंडल संगमाने तत्व ध्यानी धरा
जातीच्या कनिष्ठतेची खंत दूर सार
शिवभक्त हाच वर्ग श्रेष्ठखरा

अशाप्रकारे त्यांनी जातीग्रस्त समाजाच्या धिक्कार केला आणि हिंदू समाजातील चातुर्नवर्ण व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करण्यासाठी धैर्याने आवाज उठविला. शेकडो जाती त्यांच्या उपजाती आणि त्यांचे श्रेष्ठ कनिष्ठतेवरून होणारे झगडे पाहून त्यांना गुन्हा येईल संपूर्ण मानव समूहात भक्त आणि भवी म्हणजे चांगली आणि वाईट अशा दोनच जाती त्यांनी मानल्या. बसवेश्वरांनी आपला विचार प्रत्यक्ष आचरणात आणला अस्पृश्य मानला गेलेल्या लोकांना बसवेश्वरांनी स्थापन केलेल्या सामाजिक धार्मिक विचार मंचाचे म्हणजेच अनुभव मंडपाचे सभासदत्व देण्यात आले धार्मिक आणि सामाजिक बाबतीत त्यांनी त्यांना समान दर्जा दिला ते म्हणतात,

मी श्रियाळाला सावकार म्हणू?
आणि मचय्याला धोबी?
कक्कय्याला ढोर म्हणू?
आणि चन्नयाला चांभार?
आणि मी जर स्वतःला ब्राह्मण म्हणविले
तर कुडलसंगम माझी खिल्ली उडवेल.

जन्मधिष्ठत श्रेष्ठत्वाद्वारे नव्हे तर गुणधिष्ठित तत्त्वाच्या आधारे योग्य ठरणारे सर्व लोक धार्मिक दृष्ट्या संपूर्णतः समान असल्याचा निर्वाळा यात स्पष्ट दिसतो या सामाजिक सुधारण्याच्या परिणाम म्हणून बसवेश्वराला प्रतिगामी शक्तीच्या प्रखर विरोधाला तोंड द्यावे लागले .असे असूनही ते महत्त्वपूर्ण फलित साध्य करू शकले कारण ते केवळ एखाद्या स्थानिक अथवा सीमित सामाजिक सुधारणेच्या प्रचारक नव्हते. प्रेम आणि फक्त प्रेम हेच त्यांच्या सामाजिक सुधारण्याचे अधिष्ठान होते त्यांचे माणुसकी बद्दलचे प्रेम आणि विशेषतः अधिस्तरावरील आणि खचलेला रंजलेला ,गांजलेल्या ,पददलित आणि समाजाने झिडकावलेले लोक अशा सर्वांबद्दल त्यांना वाटणारा जिव्हाळा अमर्याद होता.

**महात्मा बसवेश्वर यांचे धार्मिक कर्मकांड आणि अंधश्रद्धे विषयीचे विचार:-**

पाश्चात्त्य समाजशास्त्रज्ञ इमाईल दुर्खीम यांच्या मते,"पवित्र असणाऱ्या म्हणजेच सोवळ्या व निषेध मानल्या जाणारा वस्तू प्रती असलेला विश्वास व कृतीमधील परस्परावलंबित्वातून उत्पन्न होणारी व्यवस्था म्हणजेच धर्म होय, अशा विश्वासांना अनुसरणाऱ्या व प्रथा पाळणाऱ्या व्यक्तींना धर्म चर्च सारखा नैतिक लोकसमूहात संघटित करीत असतो."

दुर्खीम स्पष्ट करतो की, धर्माची उत्पत्ती ही अशा सामाजिक विचार आणि विश्वासातून होते की ज्यांना समाज पवित्र मानतो. दुर्खीमच्या सिद्धांतात हिंदू धर्मावर लागू केल्यास हिंदू धर्मातही पवित्र- अपवित्र, शुभ- अशुभ ,धार्मिक कर्मकांड विश्वासातून जन्माला आलेली दिसून येते.

महात्मा बसवेश्वरांनी हिंदू धर्मातील अंधश्रद्धा, कर्मकांड जातीयता ,बळी प्रथा व्रत वैकल्य ,उपास - तपास इत्यादीवर हल्ला केला आहे. ते त्यांच्या वचनातून स्पष्ट होते बुद्धीवादी असल्यामुळे बसवेश्वरांनी आध्यात्मिक उन्नती सहाय्य करणाऱ्या श्रद्धेच्या स्वीकार केला पण अंधश्रद्धा आणि भोळसट चालीरीतीचा, रुढी स्वीकार केले नाही. फल ज्योतिष्य, शकुन - अपशकुन, दिवस आठवडे अथवा तारे यांच्या प्रभाव यासारख्या असंख्य अंधश्रद्धा लक्षावधी लोकांच्या मनात खोल रुतून बसलेल्या होत्या. कोणत्याही छोट्या मोठ्या कारणासाठी प्रत्येक ठिकाणी दैवी शक्तीवर, चमत्कारावर विसंबून राहण्याची लोकांना सवय पडली होती धर्मगुरूच्या, पुरोहिताच्या दांभिकपणा, भ्रष्टाचार आणि लबाडी यांच्या भोळ्या मनाला कळत नव्हती बसवेश्वरांनी या सगळ्यांच्या निषेध केला आणि हा धार्मिक अन्याय निपटून टाकण्याचा कसोशीने प्रयत्न केला ते ठामपणे सांगतात की,

जेव्हा जेव्हा आपले अंतकरण कौल देईल
ती शुभ वेळ आहे हे खुशाल जाण
सारे शकू शुभ आहेत असे मन
मिलनाची सुनिश्चित आहे
चंद्र -तारे अनुकूल आहेत
आणि हो ,उद्यापेक्षा आज अधिक चांगला आहे
जे सहज फलप्रद होते
कुंडलसंगाच्या उपासकांना ते तुझेच !

दुसरा एका वचनात ते म्हणतात की,

माझ्या मुळी ध्यानातच येत नाही
मका दिवस आणि तमका आठवडा
आम्ही की रास चांगली की वाईट
माझ्या दृष्टीने रात्र हा एक विभाग
आणि दिवस हा दुसरा विभाग
भक्ताची एक जात
आणि 'अ ' भक्ताची दुसरी जात

त्यांच्या दृष्टीने सारेच शकून शुभ होते सारेच दिवस पवित्र होते.

बसवेश्वरांच्या मते जे देवाला दूध ,लोणी ,तूप अर्पण करतात ते अंधभक्त होते त्या संदर्भात महात्मा बसवेश्वर म्हणतात,

दूध ते उच्छिट तथा वासराचे
पाणी ते मत्स्याचे उच्छिष्टची
पुष्प ते उच्छिट तथा भ्रमराचे
साधन पूजेचे काय सांगा?

दूध हे वासराचे उष्ट आहे, पाणी माशाची उष्ट असेते, पुष्प भ्रमराची उष्ट असते, वापरलेले अस्वच्छ उष्ट साधने देवांच्या पूजेचे साधन होऊ शकते का? असा प्रश्न ते भाविकांना करतात

बडी प्रथेविरुद्ध वचन लिहिताना ते बोकड्याला उद्देशून म्हणतात की,

रड ओरड हे बकरी
तू टाहो फोड
म्हण की वेद प्रामाण्याने
तुला बळी दिले जात आहे
धाय मोकळून रड त्यांच्यापुढे
जे वेद पठण करतात
टाहो फोड त्यांच्यापुढे
जे शास्त्र श्रवण करतात
कुंडलसंघदेव नक्कीच घेईल
तुझ्या आक्रोशाची दखल

बुद्ध ही असाच अस्वस्थ आणि करुनेने व्याकुळ झाला होता आणि त्यानेही बडी प्रथेच्या आणि अन्य रुढीच्या विरोधात संघर्ष केला होता बसवेश्वरांनी अशा रूढी विरुद्ध आणि या रूढींना जबाबदार असणाऱ्या पुरोहिता विरुद्ध बंड पुकारले.

महात्मा बसवेश्वर एका वचनात म्हणतात की.

दगडाच्या देव देव नव्हे|
मातीच्या देव देव नव्हे|
वृक्षाच्या देव देव नव्हे|
सेतू बंध रामेश्वर|
आणि इतर क्षेत्राच्या|
देव देव नव्हे|
देव तुमच्या अंतर्यामी|
हे कुंडल संघमदेवा|

अशा पद्धतीने आपल्या वचनात मूर्ति पूजेला विरोध केला आहे मूर्तिपूजा सोडून द्या देव तुमच्या अंतर्यामी आहे असा संदेश त्यांनी आपल्या वचनातून दिलेला आहे आपल्या एका वचनात ते म्हणतात,
दगडाच्या साप पाहून ते म्हणतात

दुधाच्या अभिषेक करा
प्रत्यक्षात साप पाहून म्हणतात
त्याला ठेचून काढा
जंगन भिक्षे साठी येताच
म्हणतात पुढे हो
खात नाही त्या लिंगाला मात्र
नैवेद्य देतात
वरील गोष्टीच्या फायदा उठविण्याचे
थोडे जरी कुंडल संघमाच्या शरणांना वाटले
तरी फुटालं ढेकळासारखे
पत्रावर आढळणाऱ्या

बसवेश्वर म्हणतात की जर जंगमाला स्नानासाठी पाणी दिले नाही आणि पूजाच्या वेळी अभिषेक म्हणून लिंगावर पाणी ओतले तर त्याच्या काय उपयोग?
प्रेम करुणा हे त्यांच्या तत्त्वज्ञानाचे आणि धर्माचे परवलीचे शब्द होते आपल्या एका सुप्रसिद्ध वचनात ते म्हणतात,

असा कोणता धर्म असेल?
ज्यात करुणा नाही
करुणा असायलाच हवी
सारा जीव जाती विषयी
करुणा मूळ आहे
धर्म श्रेष्ठतेचे
कुंडल संगम देव फिकीरही करीत नाही
करुणाहीनाचे

त्यांची सर्व सामाजिक, धार्मिक सुधारणा या करुनेचे आणि मानवतेबद्दलच्या सर्वव्यापी प्रेमाचे अधिष्ठान होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की जातिव्यवस्थेची मुख्य द्वारे ही स्त्री आहे स्त्रियांवर अनेक बंधने लादून जातीव्यवस्था निर्माण केली आहे आणि त्यांचे गौरव गाण हे धर्मग्रंथात केले आहे. बसवेश्वरांच्या काळात ही समाज व्यवस्थेत स्त्रीला शूद्र व बहिष्कृत समजले जात असे स्त्रीवर अन्याय होता म्हणून त्यांनी स्त्रियांसाठी मोठे भरीव कार्य केले. स्त्रियांना मत स्वातंत्र्याचा अधिकार दिला त्यांना धार्मिक आणि अध्यात्मिक हक्क दिले स्त्रियांची अशुद्धतेच्या कल्पनेतून आणि पंचसूतकापासून सुटका केली. आज जिथे भगवा वस्त्र धारण करून धार्मिक गुरु असल्यांच्या दावा केला जातो त्याबद्दल बसवेश्वर म्हणतात की भस्म गंध तिडा लावून काय उपयोग आहे मनी गडात बांधून काय उपयोग आहे जर तुमच्यात शुद्ध अंतकरण नसेल मनाची शुद्धता नसेल सर्व देखावा आहे. बसवेश्वराने धर्मातील सर्व प्रकारचे कर्मकांड व अंधश्रद्धेला विरोध केलेला आहे.

**निष्कर्ष:-**

महात्मा बसवेश्वर एक आध्यात्मिक गुरु असले तरी ते एक बंडखोर संत कवी आणि थोर समाज सुधारक होते. ज्यांनी 12 व्या शतकातील प्रस्थापित समाज व्यवस्थेमध्ये जिथे जातीव्यवस्था पितृसत्ताक व्यवस्था आणि धर्म व्यवस्था अंतरछेदी स्वरूपाची होती. त्यांनी जातीभेद, लिंगभेद, धार्मिक कर्मकांड, अंधश्रद्धा यांच्यावर आपल्या वचनाच्या साह्याने प्रहार केला मूर्ती पूजेला विरोध केला आणि माणसाच्या अंतर्यामीचे देव आहे असा संदेश दिला. आज भारतात मजेत पाडून मंदिरे बांधले जाते अनेक मंदिरे बांधून हिंदुराष्ट्र बनविण्याच्या विचार केला जातो तर बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर मूर्ती पूजेला विरोध करून धर्मातील कर्मकांडाला विरोध करत आहेत आणि दया हाच धर्म आहे. दया धर्माच्या मूलमंत्र आहे असे वचने त्यांनी लिहिलेले आहे.

राष्ट्रीय सुरक्षा बोट नुसार 2019 मध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जनजातीविरुद्ध गुन्हा मध्ये क्रमशः 60% आणि 27% नी वृद्धी होताना दिसते सांप्रदायिक हिंसेमध्ये वाढ होताना दिसते तिथेच बाराव्या शतकात महात्मा बसवेश्वर जातीभेद पाडू नका असा संदेश देतात .मनुष्य जन्माने श्रेष्ठ ठरत नाही तर कर्माने श्रेष्ठ ठरतात असे वचनेते लिहितात. आजही आपण जाती जाती धर्माधर्मात भेदभाव करताना दिसतो तर महात्मा बसवेश्वर आपला एका वचनात म्हणतात,

हा कोणाच्या हा कोणाचा हा कोणाच्या असे नच म्हणावे|
हा आमच्या हा आमच्या हा आमच्या असेचि|
वदवावे कुंडल संगमदेवा तुमच्या| घराच्या पुत्र म्हणावे|

महात्मा बसवेश्वरांची वचने जरी 800 वर्षांपूर्वीच्या काळातील असली तरी त्यांची शिकवण पूर्णपणे आधुनिक व व्यवहार्य असून आज प्रस्थापित असलेल्या भारतीय समाज व्यवस्थेशी सुसंगत वाटते आणि ही महात्मा बसवेश्वराची जाती आणि धार्मिक कर्मकांड व अंधश्रद्धे विषयीची वचने भारतीय समाजावर लागू होतात असे दिसून येते याच्या असा निष्कर्ष निघतो की आज ही भारतीय प्रस्थापित व्यवस्था पूर्णपणे समानता स्वीकारलेली नाही आहे जी समानतावादी आधुनिक मूल्यात्मक विचार महात्मा बसवेश्वरांच्या वचनामध्ये दिसून येते.

**संदर्भ ग्रंथ :-**

1) बोरकर, नलिनी (2025). भारतीय ज्ञान प्रणाली समाजसुधारक समस्या आणि चळवळी, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर.
2) तिप्पेरुद्रस्वामी,एच (2003) भारतीय साहित्याचे निर्माते बसवेश्वर, साहित्य अकादमी, न्यू दिल्ली.
3) लोटे, रा.ज(2016), भारतीय समाज शास्त्रीय परंपरा, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिकेशन नागपूर.
4) आगलावे प्रदीप नागोराव आणि भगत राहून जनार्दन (2023) ललिता पूर्ण श्री साईनाथ प्रकाशन 1, भगवानगड कॉम्प्लेक्स धरमपेठ नागपूर.
5) Anubhav mandap ,Monday, October 28,2013,lingayatrelingio./blogspot.com
6) old.rriournals.com/past.i...